# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.०९ दिनांक २७.०१.२०२१

## पालघर पोलीस दलाकडुन, केळवा सागरी पोलीस ठाण्यात रक्तदान शिबीराचे आयोजन

मा.श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक सो, पालघर, मा.श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक सो, पालघर, मा.श्री.विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी सो, पालघर यांचे मार्गदशनाखाली रस्ता सुरक्षा अभियान अनुषंगाने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन केळवा सागरी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र ब्लड बँक यांचे समन्वयाने सकाळी ०९.०० ते ०४.०० वाजेपर्यंत भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

केळवा सागरी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी भीमसने गायकवाड यांनी पोलीस ठाणे परिसरातील नागरींकांमध्ये मोठया प्रमाणात जनजागृती करुन नागरीकांना दिनांक २६/०१/२०२१ रोजी रक्तदानाचे महत्व पटवुन दिले होते त्यामुळे २६ जानेवारीला केळवा परीसरातील तरुण वर्ग व महीलांनी मोठया प्रमाणात प्रतिसाद दिला. तसेच या निमीत्ताने ७०० ते ८०० नागरीकांनी पोलीस ठाण्यात उपस्थीती दर्शवीली होती. रक्तदात्यामध्ये, पोलीस अधीक्षक कार्यालय, केळवा पोलीस ठाणे, येथील पुरुष व महीला पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच पोलीस पाटील, सरपंच, सामाजीक कार्यकर्ते यांनी या कार्यक्रमास हजेरी लावुन ३३० रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे.

केळवा सागरी पोलीस ठाण्याचे वतीने रक्तादात्यांना टिशर्ट, मास्क, सॅनिटायझर व पुष्पगुच्छ देवुन प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमास केळवा सागरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी भीमसेन गायकवाड, पोलीस उप निरीक्षक हरेश धनगर व पोलीस अंमलदार, यांनी केलेल्या जनजागृती व नियोजनामुळे रक्तदान शिबीर कार्यक्रम यशस्वी पार पडला आहे. केळवा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक श्री.भीमसेन गायकवाड यांनी व त्यांच्या टिमने रक्तदान करणा-या रक्तदात्यांचे आभार मानले आहेत.